## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

प्रस्तुत प्रकरणामध्ये वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाईकरीता दाखल केले आहेत.

**दावा मिळकतीचे वर्णन :–**

०२. मौजे अनसिंग, ता. मालेगांव, जि. वाशिम येथील शेतजमिन गट क्र.२४, क्षेत्रफळ ३ हेक्टर ६४, आकार ९.८० व हिस्सा १ हेक्टर ८२ आर ज्यासी चर्तुःसिमा पुर्वेस– मुंढे रा. अनसिंग यांची जमिन, पश्चिमेस– वसंत वाघ रा. कुरळा यांची जमिन, उत्तरेस– किसन कागणे रा. कुरळा यांची जमिन व दक्षिणेस– राजु कागणे रा. कुरळा यांची शेतजमिन. (यांस येथुन पुढे **दावा मिळकत** असे संबोधण्यात येते. )

०३. वादी यांची थोडक्यात केस अशी की, वादीच्या वडीलांनी दोन लग्न केली असुन वादीला एक सावत्र आई असुन वादी व प्रतिवादी हे भाऊ–बहिण असुन प्रतिवादी क्र.१ ही वादीची सावत्र बहिण तर प्रतिवादी क्र.२ ही वादीची सख्खी बहिण आहे. वादीचे वडील– निवृत्ती झाडुजी इंगळे यांचा अजुन एक मुलगा म्हणजेच वादीचा सावत्र भाऊ रमेश हा दिनांक १७/०१/१९९७ वादीची सावत्र आई लक्ष्मीबाई यांच्याशी बोलचाल करुन वाद घालुन गेला असुन तो आजपर्यंत परत आला नाही. वादीचे वडील निवृत्ती झाडुजी इंगळे यांचे दिनांक ०१/०८/१९९७ रोजी निधन झाले आहे. वादीच्या वडील मयत झाल्यानंतर वादीची सावत्र आई ही वादीच्या घरी लागली व वादीनेही कधीही तिला सख्या मुलाची उणीव भासु दिली नाही. तसेच वादीच्या दोन्ही बहीणीच्या लग्नाचा खर्च वादीनेच केला आहे. वादीने दावा मिळकत ही दि. १३/०४/१९९९ रोजी रजिष्टर खरेदी खत क्र. २५४/१–७ रू. ८२,५८० चे मोबदल्यात नामे श्री. गजानन चिनकुराव कागणे, रा. कुरळा यांचेकडुन वादीने व वादीच्या पत्नीच्या वडीलांनी केलेल्या आर्थिक मदतीतुन विकत घेतली आहे.

०४. वादीने पुढे असेही कथन केले आहे की, त्यांचे वडील नोकरीवर असतांना मयत झाल्याने त्यांच्या ठिकाणी अनुकंपा तत्वावर नोकरीवर लागणेसाठी वादी हा वारस या नात्याने नोकरीस लागणार होते. परंतु वादीची सावत्र आई हीने असा अट्टहास घातला की, जर वादीला अनुकंपावर नोकरीवर लागायचे असेल तर त्यांच्या नावावर असलेली दावा मिळकत

ही त्याला तिच्या नावावर करुन द्यावी लागेल. त्यामुळे नाईलाजास्तव इच्छा नसतांना बळजबरीने नोकरी लागण्यासाठी आईच्या इच्छेप्रमाणे वादीने सदरहु जमीन सावत्र आई हिच्या नावावर करून दिली आहे.

०५. त्यानंतर, वादी वडिलांच्या जागेवर अनुकंपा तत्वावर भुमिअभिलेख कार्यालय, हिंगोली येथे नोकरीवर लागल्यानंतर वादीने त्याच्या सावत्र आईचा पुर्ण सांभाळ केला. कालांतराने वादीची आई जेव्हा थकल्या तेव्हा तिने सर्व प्रतिवादी व वादी यांना बोलावुन दावा मिळकतीत वाटणी संबंधी प्रस्ताव ठेवला. त्यावर दोन्ही प्रतिवादी यांनी त्यांच्या आईला त्यांना दावा मिळकत त्यांना नको असे सांगितले. परंतु वादीची सावत्र आई प्रतिवादी यांना म्हणाली की, तुम्ही माझ्या मुली आहात तसेच तो माझा मुलगा परंतु तो भविष्यात तुम्हाला बेमान होईल म्हणुन मी ही वाटणी करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे दि. २२/०५/२०१३ रोजी सर्व प्रतिवादी आणि वादी यांनी वाटणीपत्रावर सह्या केल्या व वादी आणि प्रतिवादी यांच्या इच्छेविरूध्द वाटणीपत्र करण्यात आले. त्यानंतर दि. ०३/०९/२०१६ रोजी वादीची सावत्र आई वादीच्या राहत्या घरी मौजे कुरळा येथे निधन पावल्या, त्यांच्या अंतविधीपासुन ते सावडण्याच्या कार्यक्रमापर्यंतचा सर्व खर्च वादीने केला. परंतु त्यानंतर प्रतिवादी क्र. २ चे पती सतीश बनसोडे याने वादीनी पुढे अर्धी दावा मिळकत वहिती करु नये व दावा मिळकतीत प्रतिवादी क्र.१ चा अर्धा हिस्सा असुन त्यांना तो विकायचा आहे असे सांगीतले. त्यावर वादीने दावा मिळकत ही त्याची वडीलोपार्जीत मिळकत नसुन त्याची स्वयसंपादीत मिळकत आहे आहे असे सांगुन प्रतिवादी क्र.१ हिला समजतिण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रतिवादी क्र.१ चे पती यांनी कायदेशीर वाटणी करण्यास नकार दिला. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला असून प्रस्तुत अर्जान्वये प्रत्यक्ष वाटणी होवुन प्रत्यक्ष ताबे निश्चित होत नाहीत व प्रत्यक्ष ताब्यात वाटणीप्रमाणे दावा मिळकत दिल्या जात नाही तोपर्यंत प्रतिवादी यांनी दावा मिळकती संदर्भात कोणा सोबतही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये व वाद मिळकतीमध्ये ति–हाईत व्यक्तीचे हितसंबंध निर्माण करु नये असा तात्पुरत्या मनाई हुकुमाची मागणी केलेली आहे.

०६. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.३० वर आपले म्हणणे सादर करुन सदरचा अर्ज पुर्णपणे खोटा व चुकीचा असल्याचे कथन केले आहे. त्यांच्या प्रतिकथनानुसार, वादीने दावा मिळकत ही त्यांचे वडील मयत निवृत्ती झाडुजी इंगळे हे भुमी अभिलेख कार्यालयामध्ये नोकरीला असतांना त्यांचे पेन्शन व ग्रॅज्युयटी जीपीएफ व विमाच्या पैशातुन घेतली असल्याचे कथन केलेले आहे. तसेच मयत निवृत्ती इंगळे यांची शेवटची इच्छा अशी होती की, त्यांच्या

सेवानिवृत्ती नंतरच्या मिळालेल्या पैशातुन काही जमिन ही लक्ष्मीबाई यांनी व काही जमिन ही वादी हा सुशिक्षीत बेकार असल्याने घ्यावी. त्याकरिता मयत निवृत्ती झाडुजी इंगळे यांनी रक्कम रु.८२,५८०/– दिनांक १३.०४.१९९९ रोजी वादीच्या नावे वादातील खरेदीचा दस्त करुन दिला होता. त्यावेळी वादी हा काहीही काम करीत नव्हता. त्यामुळे वादीच्या नावावर झालेली दावा मिळकत ही संयुक्त व मयत निवृत्ती झाडुजी इंगळे यांच्या पैशातुन विकत घेतलेली मिळकत आहे. एकंदरीत वादीने जाणुन बुजुन प्रतिवादी क्र.१ व तिचा भाऊ रमेश इंगळे यांची जमिन हडप करावयाची असल्याने खोटे कथन करुन दावा आणलेला असुन प्रतिवादी यांनी वादीचा दावा खारीज करण्याची विनंती केली आहे.

०७. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा लेखी युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांना मी माझी कारणांसहित उत्तरे यापुढे नमूद करीत आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | : | **नकारार्थी.** |
| २. सोईस्करतेची तुला वादींच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात का ? | : | **नकारार्थी.** |
| ३. मागणी केलेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न दिलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. असे वादी सिध्द करतात काय ? | : | **नकारार्थी.** |
| ४. काय आदेश ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०८. प्रस्तुत कामी वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. याउलट, प्रतिवादीने त्यांचे कथनाचे पुष्ठयर्थ देखील कागदपपत्रे दाखल केलेली आहेत. त्याचा योग्य ठिकाणी उल्लेख केलेला आहे.

**मान्य तथ्ये :**

०९ वादी व प्रतिवादी हे भाऊ–बहीण असुन प्रतिवादी क्र.१ ही वादीची सावत्र बहिण असुन प्रतिवादी क्र.२ ही वादीची सख्खी बहिण आहे.

**मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या अनुषंगाने :**

१०. सदरचे चारही मुद्दे एकमेकांशी सल्लग्न असलेने पुनरावृत्ती टाळणेसाठी मी ते एकत्रीत विचारात घेत आहे.

११. वादीचे कथनानुसार दावा मिळकत ही त्याने रजिष्टर खरेदीखताने विकत घेतली असुन ती वादी व वादीच्या वडीलांनी केलेल्या आर्थिक मदतीतुन विकत घेतलेली आहे. तसेच दावा मिळकत ही स्वःकष्टार्जीत मिळकत आहे. असे असतांना, वादीने बळजबरीने नोकरी लागण्यासाठी सावत्र आईच्या अट्टहासामुळे दावा मिळकत ही सावत्र आईच्या नावावर करुन दिलेली आहे. परंतु सदर खरेदीखत हे वादीच्या ईच्छेविरुध्द झालेले असल्याने त्यानुसार कोणतीही हक्क निर्माण झालेले नाहीत. तसेच दावा मिळकत देखील वादीच्या कब्जेवहिवाटीत आहे. तसेच त्यानंतर वादीच्या सावत्र आईने केलेले वाटणीपत्र देखील केवळ सावत्र आईचा हट्ट पुरवण्याकरीता व तिची शेवटची ईच्छा असल्याने वादीने ईच्छेविरुध्द वाटणीपत्रावर सह्या केल्या आहेत व ते देखील वादीच्या ईच्छेविरुध्द झाले असल्याने बेकायदेशीर आहे असा युक्तीवाद वादी यांनी केलेला आहे व दाव्याचे अंतीम निकालपावेतो दावा मिळकत हस्तांतर करु नये व मिळकतीत ति–हाईत हक्क निर्माण करु नये अशी निरंतर मनाई हुकुमाची मागणी वादी यांनी केलेली आहे.

१२. याउलट प्रतिवादी यांनी वादींची कथने नाकारुन झालेला व्यवहार हा वादीच्या संमतीनेच झालेला असल्याने तो कायदेशीर असल्याचे युक्तीवाद केलेला आहे.

१३. अभिलेखावरील निशाण ३ वरील अ.क्र.६ वरील खरेदीखताचे अवलोकन केले असता, दावा मिळकत वादी यांनी गजानन कागणे यांच्याकडुन विकत घेतल्याचे सकृतदर्शनी दिसते. तसेच त्यानंतर वादीनेच सदरची मिळकत पुन्हा त्याची सावत्र आई लक्ष्मीबाई हिला २००८ साली विक्री केल्याचे देखील निशाण ३ वरील अ.क्र.७ वरील खरेदीखतावरुन दिसते. वादीने सदरचे खरेदीखत त्याचे ईच्छेविरुध्द केला असल्याचा युक्तीवाद केला आहे. वादीचे कथनानुसार त्याला अनुकंपाखाली नोकरी मिळणेकामी सावत्र आईच्या आग्रहाखातर ईच्छेविरुध्द त्याने खरेदीखत केलेले आहे. त्याअनुंषगाने वादीने निशाण ३९ वर अनुकंपासाठीचा अर्ज, त्याचा आदेश दाखल केलेला आहे. परंतु त्या दस्तावरुन सकृतदर्शनी सदरचे खरेदीखत सावत्र आईच्या आग्रहाखातर ईच्छेविरुध्द केले असा निष्कर्ष निघत नाही. याऊलट सकृतदर्शनी तथाकथित खरेदीखतावर वादीच्याच सह्या आहेत व सदर

खरेदीखतानुसार महसूल सदर अंमल देखील झालेला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदरचा खरेदीखताचा दस्त वादीचे इच्छेविरूद्ध बळजबरीने करण्यात आला हे सिद्ध करण्याकरिता वादीचे कथनाशिवाय कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. तसेच तथाकथीत निशाणी ४७ वरील अ.क्र.१ वरील वाटणीपत्रावर देखील वादीच्या सह्या आहेत. त्यामुळे सकृतदर्शनी ते देखील सावत्र आईच्या आग्रहाखातर ईच्छेविरुध्द केले असा निष्कर्ष निघत नाही.

१४. पुढे जावुन, मालमत्ता हस्तांतरण कायद्याचे कलम ५२ नुसार वादीस पुरेसे सरंक्षण उपलब्ध आहे. तसेच प्र.वादी हे दावा मिळकत विक्री करणार आहेत अथवा करण्याच्या तयारीत आहेत असे दर्शविणारा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे वादीने सकृतदर्शनी केस सिद्ध केली नाही. तसेच सोयीस्करतेचा तुला व अपरिमीत नुकसानीचे तत्व हे वादींच्या त्यांच्या बाजुने नाही. त्यामुळे मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाईचा आदेश मिळणेस वादी पात्र नसलेचे सकृतदर्शनी दिसुन येते.

१५. सबब, उपरोक्त चर्चेनुसार तसेच कायद्यातील तरतुदीनुसार आणि वर नमुद कारणांकरिता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. व मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारित करत आहे.

१६. सबब, उपरोक्त चर्चेनुसार तसेच कायद्यातील तरतुदीनुसार आणि वर नमुद कारणांकरिता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे व मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारित करत आहे.

## आदेश

वादीचा अर्ज (निशाण क्र. ०५) **नामंजूर** करणेत येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by
AMIT SUNIL KOSHTI
Date: 2024.12.12
11:18:21 +0530

स्थळ : मालेगांव. ( **अ. सु. कोष्टी** )

दिनांक : ०६.१२.२०२४. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मालेगांव.

**CERTIFICATE**

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. C. R. Lande (Grade III ) |
| Name of Court | C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 06/12/2024 |
| Judgment/Order signed by the PO on | 06/12/2024 |
| Judgment /Order uploaded on | 12/12/2024 |